# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर   वर्ष ४ थे   अंक २३४ वा मंगळवार दि.११ मार्च २०२५   पृष्ठे ४   स्वागत मूल्य २ रू.







# महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या पाठिंब्यासाठी पुण्यात बौद्ध अनुयायांचा विराट मोर्चा

पुणे : बुद्धम् शरणम् गच्छामि ।। धम्मम् शरणम् गच्छामि।। संघम् शरणम् गच्छामि .. च्या स्वरात शांततेचा संदेश देत महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या पाठिंब्यासाठी पुण्यात बौद्ध अनुयायांचा विराट मोर्चा काढण्यात आला.

महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन समिती, पुणेच्या वतीने आयोजित या महामोर्चात लाखोंच्या संख्येने बौद्ध अनुयायी सहभागी झाले होते. बिहार मधील बूद्धगया येथे तथागत भगवान गौतम बुद्धांचे हजारो वर्षापासूनचे विहार आहे. मात्र त्याचा ताबा बौद्धेतर विशेषता ब्राम्हणी धर्मपंडितांकडे आहे. या गोष्टीचा जगभरातून निषेध होत असून महाबोधी विहाराचे व्यवस्थापन हे बौद्ध अनुयायांच्या देखरेखी खाली कार्यान्वित करण्यात यावे, अशी मागणी होत आहे. सध्या बुद्धगया येथे जगातील बौद्ध भिख्खूंचे प्रतिनिधी आंदोलन करत आहेत. याच महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आज बालगंधर्व ते अलका चौक दरम्यान बौद्ध समाजाचा महामोर्चा काढण्यात आला.

भदंत नागघोष महाथेरो, भंते राजरत्न, भंते बुद्धघोष थेरो, भंते धम्मधर थेरो.भंते पय्यारक्खित.भंते धम्मानंद, भंते यश, भंते प्रियदर्शी भंते सुमंगल, भंते राहुल आदी बौद्ध भिख्खूंच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या महामोर्चातलाखोंच्या संख्येने बौद्ध अनुयायी सहभागी झाले होते. बालगंधर्व चौकात बुद्ध वंदना करून मोर्चाची सुरूवात झाली. तथागत भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीसह शांतता संदेश देत हा मुक महामोर्चा मार्गस्थ झाला. भंते च्या हस्ते डेक्कन येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अलका चौकात सभा घेवून मोर्चाचा समारोप करण्यात आला. यावेळी राष्ट्रपती कार्यालय, पंतप्रधान कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालय व जिल्हाधिकारी यांना मागणीचे निवेदन देण्यात आले. पोलिस उपायुक्त संदीप सिंग गिल यांनी निवेदन स्वीकारले. मोर्चाला संबोधीत करताना भंते राजरत्न म्हणाले, इ. स. पूर्व ५६३ पासून तथागत भगवान गौतम बुद्धांना ज्या ठिकाणी ज्ञानप्राप्ती झाली त्या ठिकाणी सम्राट अशोकाने त्यांच्या काळात ऐतिहासिक बौद्ध विहाराची निर्मिती केली आहे. मात्र आज त्या विस्तीर्ण बौद्ध विहाराच्या परिसरात अतिक्रमण करण्यात आले असून इतर देवी देवतांच्या नावाने तेथील विहार रूपांतरीत करण्यात आली आहेत. ज्या ठिकाणी




महाविहार आहे त्याच्या उजव्या बाजूस बौद्ध मूर्ती सापडून देखील तिथे इतर देवी देवतांची मंदिर उभारली जात आहेत. तथागत भगवान गौतम बुद्धांची जन्मभूमी म्हणून आज जागतिक स्थरावर भारताकडे आदराने पाहिले जात. अन् आज त्याच देशात महाबोधी महाविहार मुक्तीसाथी जगभरात आनंदोलन केली जात आहेत.

लोकं रस्त्यावर उतरली आहेत. ही भारतसरकारसाठी निंदनीय बाब आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यामध्ये तात्काळ लक्ष घालावे, अशी मागणी देखील भंते राजरत्न यांनी केली.

भंते नागघोष म्हणाले, जगात बौद्ध धम्म बुद्धगया येथून प्रसारित झाला आहे, भारत देशाची ओळख जगात बुद्धभूमी अशी आहे. आपले पंतप्रधान, राष्ट्रपती अन्य देशांच्या प्रमुखांना बुद्ध मूर्ती देतात. सम्राट अशोकाणे बांधलेले बुद्ध विहार आपल्या ताब्यात नाही. बुद्धिस्ट टेंपल मॅनेजमेंट कामिटी मध्ये ९ पैकी ५ लोक हिंदू आहेत यामुळे तिथे हिंदूचे बहुमत आहे, त्या जोरावर तिथे कर्मकांड केले जाते. बुद्ध चरणी आलेल्या अनुयायांना मात्र कोणत्याही सुविधा मिळू शकत नाहीत, यामुळे जो पर्यंत १९४९ चा कायदा रद्द होणार नाही तो पर्यंत महाविहार मुक्त होणार नाही. बिहार पोलिस आणि शासन तिथे बसलेल्या उपोषण करत असलेल्या भंते आणि बौद्ध अनुयायांवर दडपशाही करत आहे. श्रीलंकेतून आलेले भंते अनागारिक यांनी १८९१ साली सुरू केलेला महायबिधी महाविहार मुक्तीचा लढा १३५ वर्षे सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. धम्म पालन गाथेने या विराट मोर्चाची सांगता झाली.

## प्रतीक माने यांचा सत्कार संपन्न



लातूर:येथील सुभेदार रामजी नगर येथील प्रतीक माने हे बिर्ला सॉफ्ट ,पुणे या कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनियर या पदावर कार्यरत आहेत. त्यांची कामाप्रतीनिष्ठा व कार्यतत्परता लक्षात घेऊन या कंपनीने बेल्जियमची राजधानी ब्रुसेल्स येथे विशिष्ट कालावधीकरिता त्यांची निवड केली आहे. युरोपियन जहाजांवरील कंटेनर्स मध्ये सुधारणा करण्यासाठीच्या प्रकल्पावर कार्य करण्यासाठी ते नुकतेच बेल्जियमकडे रवाना झाले. प्रतीक माने हे श्री मारवाडी राजस्थान विद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. औसा तालुक्यातील लोहटा हे त्यांचे मूळ गाव असून त्यांचे वडील डॉ. मिलिंद अभिमन्यू माने हे लातूर येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे सेवानिवृत्त उपप्राचार्य आहेत.त्यांची आई सौ.माया मिलींद माने या लातूर येथील श्री. गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालयात विज्ञान विभाग प्रमुख या पदावर कार्यरत आहेत तर भाऊ स्वप्निल व तेजस हे उच्चशिक्षित इंजिनियर आहेत. प्रतिकच्या भावी कार्याकरिता त्याचे काका काकू सौ पार्वती व वामन माने, बळी माने, संघमित्रा व डॉ . महेंद्र दुधारे, जनार्धन लामतुरे,डॉ.लहू वाघमारे ,हिराचंद गायकवाड, हनमंत कांबळे ,प्रा. सुरेश बडोले, जनार्धन कांबळे, प्रा. शिवशरण हावळे, अरुण गायकवाड ,शामल जाधव, वैशाली व जगजीत अंकुशे , केतन बनसोडे ,सिंधू वाघमारे यांच्यासह त्यांच्या परिसरातील व मित्र परिवारातील सर्वांनी प्रतीक माने यांच्या या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन करुन त्यांना परदेश दौऱ्याकरीता शुभेच्छा दिल्या आहेत .

## लातूर येथे साने गुरुजी शैक्षणिक संकुलात तीन दिवसीय शिक्षण महोत्सव,कालिदास माने यांची पत्रकार परिषदेत माहिती

लातूर :- शहरातील येथील साने गुरुजी शैक्षणिक संकुलात तीन दिवसीय शिक्षण महोत्सव आयोजित करण्यात आला असून मंगळवार दिनांक ११ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ठीक ०५.०० वाजता ह.भ.प. ज्ञानेश्वर वाबळे महाराज आळंदीकर यांच्या हस्ते कै. शामराव माने यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण व किर्तन आयोजित केले असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधिज्ञ उदय गवारे हे उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती साने गुरुजी शैक्षणिक संकुलाचे सचिव कालिदास माने यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

तसेच बुधवार दिनांक १२ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता वैद्यकीय, सामाजिक क्षेत्रातील आदर्श व्यक्तिमत्व मा. डॉ. विठ्ठल लहाने यांचे मी असा घडलो या विषयावर व्याख्यान असून या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ साहित्यिक भारत सातपुते हे उपस्थित राहणार आहेत.शिक्षण महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी गुरुवार दिनांक १३ मार्च २०२५ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता नागाबुवा वाचनालय हेळंब यांच्या विद्यमाने लातूर जिल्हा ग्रंथालय संघाने ४० वे वार्षिक अधिवेशनाचे आयोजन केले असून या





४० वे अधिवेशनाचे उद्घाटक म्हणून औसा विधानसभा मतदार संघाचे आमदार अभिमन्यू पवार तर अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार राहणार आहेत. तर या कार्यक्रमास जिल्हाधिकारी श्रीमती वर्षाताई ठाकूर-घुगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदरील कार्यक्रम नंदादीप विद्यालय कातळे नगर, बार्शी रोड लातूर येथे आयोजित करण्यात आला आहे. तेव्हा लातूर जिल्ह्यातील सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी व नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आव्हान साने गुरुजी शैक्षणिक संकुलाचे सचिव कालिदास माने व जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस कालिदास माने, अशोक देडे, एस.टी. चव्हाण, इस्माईल शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

# कॉम्रेड, पँथर हिरामण पगार (दादा) यांच्या शोकसभेत अनेकांनी वाहीली भावपूर्ण आदरांजली

नवी मुंबई / के. एच हनवते :- दिनांक ०८/०३/२०२५ रोजी ज्येष्ठ समाजसेवक हिरामण पगार यांचे निधन ०५ फेब्रुवारी रोजी एमजीएम रसा रुग्णालय वाशी येथे झाले होते. समाजसेवक हिरामण पगार यांनी मुंबई, नवीमुंबई. पनवेलसह पूर्ण महाराष्ट्रात नाका कामगार. घरेलू कामगार. झोपडपट्टी धारक. रिक्षा चालक. बिडी कामगार. यांच्या साठी भरीव काम त्यांनी उभे केले होते. अनेक शोसिताना त्यांनी न्याय मिळून दिला होता त्यांच्या साठी आपल्या भावना अनेक मान्यवरांनी वेक्त केल्या. काही त्यांच्या मित्रांनी सांगितले की, माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणी बाणी केली होती त्यावा तुरूंग वाश पण हिरामण पगार यांनी भोगला होता तेव्हा ते नामदेव ढसाळ यांच्या बरोबर पँथर चळवळीचा एक भग होते पुढे काही दिवसांनी नामदेव ढसाळ यांनी शिवसेना मध्ये प्रवेश केला. परंतु लोकसाठी लढायचे म्हणून ते नामदेव ढसाळ यांच्या बरोबर शिवसेनेत गेले नाहीत. अश्या




अनेक आठवणी अनेकांनी त्यांच्या शोक सभेचे वेळी माडल्या. संस्थापक अध्यक्ष, घर हक्क संघर्ष समिती हिरामण पगार दादा यांच्या शोकसभेचे आयोजन कॉंग्रेस भवन गोखले हॉल, पनवेल येथे घर हक्क संघर्ष समिती, जन हक्क संघर्ष समिती, जाती निर्मूलन आंदोलन, जन विकास संस्था,कामगार एकता युनीयन, भारतीय कम्युनिस्ट पक्ष यांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी पगार सर यांचा मुलगा निसान पगार, पत्नी प्रतिभा पगार, सुनबाई अनिता पगार व नातवंड सुद्धा हजर होते. एड. उत्तम जागीरदार सर, एड. रविंद्र जोशी सर, कॉम्रेड. उदय चौधरी, प्रवीण नाडकर, रामबाबु गुप्ता, शुभम कोठारी व समता कला मंच टिम, विलास हिवाळे, खाजामिया पटेल,एड. सुजित निकाळजे, राजु वंजारे, विनीता बाळेकुंद्री, कैलाश सरकटे, उमेश खंडारे, कोंडीबा हिंगोले, जयसिंग रणदिवे, इंद्रजित कांबळे, संतोष नरवडे, सुनंदाताई बाविस्कर, कुंडलीक कांबळे, बाळकृष्ण खोपडे, भैय्यासाहेब आठवले, अशोक जमादार, भगवान चाबुकस्वार, कलावती माळी, तानाजी कांबळे, नुरजहा शेख, भारतीताई शिर्के, राणी खोसला, व नवी मुंबई, पनवेल, मुंबई, उपनगर व सरांसोबत काम केलेले जुने सहकारी यांनी त्यांच्या कार्याचे स्मरण करून दिले व जन हक्क संघर्ष समिती व समता कला मंचचे साथी यांनी क्रांतिकारी गीत गायनाच्या माध्यमातून आदरांजली व श्रद्धांजली अर्पण केली.

## बीड : केजमध्ये भरदिवसा घरफोडी; अडीच लाखांचा ऐवज चोरट्यांने पळविला

केज : तालुक्यातील कुंबेफळ येथील बंद घर फोडून चोरट्यांनी भरदिवसा रोख रक्कम व दागिने असा अडीच लाखाचा ऐवज चोरून नेला. ही घटना रविवारी (दि.९) सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. याप्रकरणी युसुफवडगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत अधिक माहिती अशी, केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या कुंबेफळ येथील भीमराव शंकर ढोरे आणि त्यांची पत्नी छाया भीमराव ढोरे हे रविवारी (दि.९) सकाळी १०:३० च्या दरम्यान घराला कुलूप लावून त्यांच्या शेतात गेले होते. शेतातील काम आटपून ते सायंकाळी ६:३० च्या सुमारास घरी आले असता त्यांना घराचा कडीकोयंडा तोडल्याचे निदर्शनास आले.

त्यानंतर त्यांनी घरात जाऊन पाहणी केली असता घरातील सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले. चोरट्याने लोखंडी कपाटातून तीन तोळे वजनाचे सोन्याचे मिनी गंठण, पाच ग्रॅम वजनाचे कानातील सोन्याचे झुंबर, एक तोळाचे सोन्याचे मिनी गंठण, एक ग्रॅम वजनाची सोन्याची नथ, चार ग्रॅम वजनाचे सोन्याचे सरपाळे, तीन ग्रॅम वजनाचे कर्णफुले, तीन ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे करंडे, ५० ग्रॅम वजनाचा चांदीचा करदोरा आणि ऱोख रक्कम पाच हजार रुपये असा एकूण २ लाख ५१ हजार ३०० रूपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला. भीमराव ढोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून युसुफ वडगाव पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्धात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## छत्रपती श्री शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून केला महिला दिन साजरा

केज/प्रतिनिधी छत्रपती श्री शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून महिला दिन मोठ्या आनंद उत्साहात साजरा केला. अंकुर स्वयंसेवी संस्था केज, यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून महिलांनी पुष्पवृष्टी केली व सावीत्रिबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी केज येथील शासकीय कार्यालस भेट देऊन कार्यक्रम घेण्यात आले.यामध्ये केज पोलीस ठाणे, पंचायत



समितीसह इतर कार्यलयास भेटी देवून अधिकारी व कर्मचारी यांच्याशी चर्चा करून कामकाजा विषयी माहिती जाणवून घेतली. यावेळी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे सत्कार करुन महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी वैजंता गालफाडे, तसलीम इनामदार,शिलाताई हजारे, रत्नमाला गायकवाड, रंजना गवळी, अर्चना केंद्रे, वच्छला शिनगारे, अनिता कांबळे सह एकल महिला संघटनेच्या तारामती घोडके, उर्मिला गालफाडे यांच्यासह विविध संघटनेच्या व विविध क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. शेवटी कार्यक्रमाचा समारोप स्नेह भोजनानंतर फोटो स्टुडिओ मध्ये जाऊन फोटोशूट करुन करण्यात आला. जागतिक महिला दिन हा महिलांनी विविध उपक्रम घेत मोठ्या आनंद उत्साहात साजरा केला.

## संपादकीय....

# पीओके भारताचाच भाग!

पाकव्याप्त काश्मीर म्हणजेच पीओके हा भारताचा भाग असून, त्यावर आमचाच अधिकार आहे, असे आत्मविश्वासपूर्ण उद्गार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काढले होते. पाकिस्तानकडे अणुबॉम्ब आहे आणि त्यामुळे सावध राहा, असे विचार जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांनी मांडले होते; पण १४० कोटी लोकसंख्येचा देश, कोणाच्या तरी भीतीने हक्क सोडणार का, असा खडा सवालही शहा यांनी विचारला होता. डिसेंबर २०२३ मध्ये ३७०व्या कलमासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने अनुकूल निर्णय दिल्यानंतर राज्यसभेत त्याबाबत चर्चाही झाली होती. त्यावेळीही पाकव्याप्त काश्मीर भारताचाच असून, तो आपल्याकडून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही, असे ठामपणे शहा यांनी सांगितले होते. स्वातंत्र्यानंतर लवकरच पाकिस्तानी टोळीवाल्यांनी जम्मू-काश्मीरमध्ये घुसखोरी केली, तेव्हा या टोळ्यांना भारतीय जवानांनी हुसकावून लावले; पण त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी आकस्मिकरीत्या युद्धविराम घोषित केल्यामुळे पीओकेवर आपल्याला पाणी सोडावे लागले. सुमारे अर्धे काश्मीर आपल्या हातातून गेले. ३७०वे कलम रद्द करून, जम्मू-काश्मीरला मुख्य प्रवाहात आणण्याचे धाडसी पाऊल केंद्र सरकारने उचलले, त्यास पाच वर्षे लोटली. त्यामुळे पाकला बर्‍याच मिरच्या झोंबल्या; मात्र हातपाय आपटण्याशिवाय पाकिस्तान काहीही करू शकला नाही आणि शकणारही नाही. भारत व पाकिस्तानमध्ये काश्मीर हाच मुख्य प्रश्न असल्याचा निरर्थक दावा पाकिस्तान दशकानुदशके करत आला आहे.

भारतीय लष्कराकडून पुन्हा पुन्हा चोप मिळाल्यावरही पाकिस्तानच्या डोक्यात अद्याप प्रकाश पडलेला दिसत नाही. आता तर ब्रिटनच्या दौर्‍यावर असलेले परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी पाकिस्तानला स्पष्ट शब्दांत सुनावले आहे. पीओके भारताच्या ताब्यात आल्यानंतरच काश्मीरची समस्या पूर्णपणे सुटेल, असे ते म्हणाले आहेत. भारताने निराधार दावे करू नयेत. त्याऐवजी ७७ वर्षांपासून असलेला जम्मू-काश्मीरचा ताबा भारताने सोडावा, असे अविचारी उद्गार पाकिस्तानचे परराष्ट्र प्रवक्ते शफक्कत अली खान यांनी काढले आहेत; पण पीओके हा भारताचाच होता आणि भविष्यात तो आमच्याच ताब्यात येणार आहे, असेही जयशंकर यांनी ठणकावले. पीओके हा भाग पाकिस्तानने चोरला आहे आणि ज्या दिवशी पीओके भारताच्या कब्जात येईल, तेव्हाच काश्मीरची समस्या पूर्णपणे सुटेल, हे जयशंकर यांचे मत कोणालाही पटण्यासारखेच आहे. आता पाकव्याप्त काश्मीर घ्यायला आम्ही कधी विरोध केला आहे काय? तुमच्यात क्षमता असेल, तर त्या भागावर आताच दावा करा. शिवाय पाकच्या ताब्यातील काश्मीर घेताना, जो भाग चीनच्या ताब्यात आहे, तोही परत घेतला जावा, असे प्रतिपादन जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी केले आहे; मात्र ओमर यांनी विरोध केला, तरीही केंद्र त्याला जे काही करायचे आहे, ते करू शकेलच! कारण, हा भारत व पाकिस्तानमधील प्रश्न आहे. ओमर यांनी मुख्यमंत्री या नात्याने जम्मू-काश्मीरचा वेगाने विकास कसा करता येईल, ते पाहावे. पीओकेबद्दल त्यांना कुणीही सल्ला विचारलेला नाही. तेव्हा नको त्या प्रश्नात त्यांनी नाक खुपसण्याचे कारण नाही.

अलीकडील काळात काश्मीर खोर्‍यापेक्षा जम्मूमधील दहशतवादी कारवायांत वाढ झाली असून, त्यांना वेसण घालण्याच्या कामात त्यांनी लक्ष घालावे, हे बरे! एक लक्षात घेतले पाहिजे की, २२ फेब्रुवारी १९९४ रोजी लोकसभा आणि राज्यसभेत पीओके हा भारताचा अविभाज्य भाग असल्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला होता. त्यामुळे उद्या पाकिस्तानमध्ये घुसून पीओके ताब्यात घेण्याचे भारत सरकारने ठरवल्यास त्यास कोणाचाही विरोध असणारच नाही. शिवाय जम्मू-काश्मीरच्या विधानसभा मतदारसंघांची पुनर्रचना करताना आपण पीओकेसाठी २४ जागा सोडून दिलेल्या आहेत. मुळात पीओकेचा विकास करण्यात पाकिस्तान सरकारला अजिबात यश आले नसल्यामुळे तेथील स्थानिक जनता संतापलेली आहे. पीओकेमधून 'वन बेल्ट, वन रोड' (ओबीओआर) हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प चीनने हाती घेतला आहे. यामुळे पाकिस्तानच्या डोक्यावरील कर्ज वाढले आहे. म्हणूनच याबाबत पीओकेतील जनतेत जागरूकता निर्माण करण्याचे काम भारताला करावे लागेल. एकेकाळी दहतवादी कारवायांसाठी अर्थपुरवठा केल्याच्या आरोपावरून काश्मीरमधील फुटीरतावादी नेता यासिन मलिकला दिल्ली न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. जम्मू-काश्मीरला भारतापासून तोडण्याच्या हेतूने मलिकने कारवाया केल्याचे न्यायालयाने शिक्षा ठोठावताना स्पष्ट केले होते. यासिनला बेकायदा कारवाया प्रतिबंधक कायद्यासह अन्य गुन्ह्यांत न्यायालयाने दोषी ठरवले होतेच. हा जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंटचा (जेकेएलएफ) प्रमुख असलेल्या यासिनने २०२६ मध्ये काश्मीरमध्ये हिंसक आंदोलन घडवले होते. त्यावेळी ठिकठिकाणी सातत्याने जाणीवपूर्वक दगडफेकीच्या घटना घडवण्यात आल्या.

भविष्यात पीओकेचे भारतात सामीलीकरण घडवणे तसे अवघड नाही. दुसरीकडे, काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणात विकासकामे झाल्याने पीओकेमधील नागरिक स्वतःहून भारतात येऊ इच्छितात, असे निरीक्षण संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पूर्वीच नोंदवले आहे. जम्मू -काश्मीरमध्ये नवीन गुंतवणूक येत आहे आणि उद्योगधंदेही उभारले जात आहेत. जनजीवन सुरळीत झाले आहे. विद्यार्थी सुरक्षितपणे शाळा-कॉलेजात जात आहेत. ३७०वे कलम संपुष्टात आणल्यानंतर तेथील दहशतवादी कारवायांत घट झाली आहे. हुर्रियत कॉन्फरन्ससारख्या आगलाव्या संघटनेचा कणा मोडण्यात येऊन, त्यांच्या नेत्यांना पाकमधून जो निधी मिळत होता, त्याची पाळेमुळे खणून काढण्यात आली. आपल्याच भूमीवरून भारत सरकारविरुद्ध गरळ ओकली गेल्यास ते खपवून घेतले जाणार नाही, असा कडक संदेश देण्यात आला. जम्मू-काश्मीरमध्ये रस्ते, पूल, कारखाने अशी अनेक विकासकामे हाती घेण्यात आली असून, त्यामुळे स्थानिक जनता खूश आहे. या पार्श्वभूमीवर काश्मीरमध्ये आर्थिक प्रगतीसोबत शांतताही प्रस्थापित झाली. ते पाहून पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकांनाही भारतात विलीन होण्याची इच्छा होईल. तशा मागण्याही आता होत आहेत. सध्या पाकिस्तान हा दिवाळखोर बनला असून भारतासमोर उभे राहण्याचीही त्याची ताकद नाही. त्यामुळे पीओके भारताकडे सोपवल्यास त्यात पाकचे भले आहे.

# ११ मार्च छत्रपती संभाजी महाराज पुण्यतिथी

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे इ.स.१६५७ रोजी पुरंदर येथे झाला आणि हिंदवी स्वराज्यात तेजस्वी तारा प्रगट झाला. राजपुत्र असल्यामुळे रणांगणातील मोहीम व राजकारणातील डावपेच यांचा संपूर्ण अभ्यास अवगत होता. त्याचप्रमाणे लहानपणापासूनच ते अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मोठे धनी होते. संभाजींना लहानपणापासूनच अनेक कठीणायीचा सामना करावा लागला.संभाजी महाराज लहान असतांनाच त्यांच्या आई महाराणी सईबाई यांचे निधन झाले आणि त्यांच्या काळजावर मोठा आघात झाला.या आघातापासुन सावरण्यास राजमाता जिजाबाई यांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी व रक्षणासाठी शूरवीर संभाजी नावाचा महामेरू उभा केला. संभाजींची सावत्र आई पुतळाबाई यांनी आपल्या मुलासारखी वागणुक देवुन वटवृक्षाचे काम केले.परंतु त्यांची दुसरी सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजीराजांच्या रस्त्यात बाभळीचे काटे रोवुन पोरकेपणाची वागणुक दिली व महाराजांच्या राजकीय कारकीर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला. संभाजीच्या मनात लहानपणापासूनच आपण स्वराज्यासाठी काहीतरी केले पाहिजे.या उद्देशाने त्यांनी राजकारणातील संपूर्ण बारकावे आत्मसात केले. मुगलांच्या घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले.त्याचप्रमाणे संस्कृतसह इतर आठ भाषांचे ज्ञान त्यांना अवगत होते.याचा फायदा भविष्यात व्हावा या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले.त्यावेळी संभाजीराजे फक्त ९ वर्षाचे होते.शिवाजी महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेतुन निसटल्यानंतर त्यांना संभाजींची चिंता वाटू लागली.औरंगजेब आगबबुला झाला अशा वेळी संभाजीराजे स्वराज्यात सुखरूप पोहचावे या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा सर्वत्र पसरवून मोगलांच्या डोळ्यात धुळ झोकून संभाजींना महाराष्ट्रात सुखरूप पोहचण्याचा मार्ग मोकळा केला.इ.स.१६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर अवघ्या १२ दिवसातच राजमाता जिजाऊंचे निधन झाले आणि पुन्हा संभाजींना मोठा जब्बर धक्का बसला.त्यानंतर त्यांच्याकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही.कारण शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.छत्रपती संभाजीं महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतरन करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज व मोगल सत्ताधाऱ्यांचा कडाडून विरोध केला.औरंगजेबाने इ.स.१६८२ साली मराठ्यांवर हल्ला केला.औरंगजेब सैन्य, दारूगोळा, हत्ती-घोडे याबाबतीत बलशाली होता.कारण औरंगजेबाचे सैन्य संभाजीं महाराजांच्या तुलनेत ५ पटीने अधिक होते.त्याकाळी जगातील सर्वात शक्तिशाली सैन्यामध्ये औरंगजेबाचा समावेश होता. तरीही संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी हिमतीने लढा दिला.त्याचप्रमाणे संभाजीं महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याच्या सिद्धी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना जोरदार धडा शिकवला.त्यामुळे संभाजीं महाराजांच्या विरुद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत कोणाचीही झाली नाही. कारण त्याकाळी संभाजीं म्हणजे एक वादळी तुफान होते. त्यामुळेच संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखालील मराठ्यांनी मोठ्या शिताफीने झुंज दिली.इ.स.१६८९ च्या सुरूवातीला संभाजीं महाराजांनी त्यांच्या महत्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणातील संगमेश्वर येथे बोलावले.१ फेब्रुवारी इ.स.१६८९ रोजी संभाजीं महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने नागोजी माने यांच्या साथीने संगमेश्वरावर हल्ला केला.मराठ्यात आणि शत्रूच्या सैन्यात मोठी चकमक झाली.मराठ्यांचे संख्याबळ कमी असल्याने शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाही.त्यामुळे शत्रूने संभाजीं महाराजांना व त्यांच्या सोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले.अशाही परीस्थितीत महाराजांना वाचविण्याचा प्रयत्न मराठ्यांनी केला.परंतु ते त्यात यशस्वी झाले नाहीत.पहिला प्रयत्न जोत्याजी केसरकर यांनी केला. यानंतर अप्पा शास्त्री यांनी देखील केला.परंतु दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले व संभाजीं महाराज औरंगजेबाच्या तावडीत सापडले.औरंगजेबाच्या तावडीत सापडल्या नंतर औरंगजेबाने महाराजांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती केली.परंतु त्यांनी आपल्या धर्माचे पालन करत इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिला. त्याचप्रमाणे राज्याचा संपूर्ण खजाना आमच्या स्वाधीन करावा अशी अट घातली तेही संभाजीं महाराजांनी मान्य केली नाही.संभाजी राजांचा धीटपणा आणि स्वराज्याच्या प्रती प्रेम पाहून औरंगजेब तिलमिला झाला आणि तेव्हा पासून संभाजीं महाराजांना यातना देण्यास सुरुवात केली.तरीही औरंगजेबाची कोणतीही अट माणन्यास व त्यांच्या सामोरं यत्किंचितही झुकण्यास महाराज तयार नव्हते. संभाजी महाराजांनी औरंगजेबाला खडसावून सांगितले की स्वराज्याच्या रक्षणासाठी व प्रजेच्या हितासाठी कोणतीही तडजोड करणार नाही. यासाठी माझे प्राण गेले तरी चालेल. अशी सिंह



गर्जना ऐकताच औरंगजेबाने संभाजीं महाराजांना कठोर यातना देण्यास सुरुवात केली.औरंगजेबाने महाराजांचे डोळे काढले, महाराजांची जीभ कापली, महाराजांवर अतोनात वार करण्यात आले.हे सगळं संभाजीं महाराज ४० दिवस सहन करीत होते. तरीही मराठा साम्राज्यासाठी लढत रहाले. एवढ्या छळाने सुध्दा औरंगजेबाचा आत्मा शांत झाला नाही. शेवटी औरंगजेबाने आपली संपूर्ण क्रूरतेची हद पार केली व ११ मार्च १६८९ रोजी महाराजांचे हात-पाय, आणि त्यांचे सर्व देह शरीरापासून वेगळे करून त्यांची क्रूरतेने हत्या करण्यात आली.शेवटी औरंगजेब हताश होऊन म्हणतो की 'माझ्या पोटी असा शूरवीर, धाडसी पुत्र जन्माला का आला नाही?याची खंत त्याला मरेपर्यंत सतावत होती.शत्रूला हेवा वाटेल असे महान कार्य संभाजीं महाराजांनी केले व जगाच्या इतिहासात कमी वयात म्हणजे ३२ व्या वर्षी स्वराज्याच्या व प्रजेच्या रक्षणासाठी बलिदान देणारा राजा म्हणून संभाजीं महाराजांसमोर आज सर्वच नतमस्तक होतात. संभाजी महाराजांना बलिदान दिनानिमित्त निमित्त कोटी कोटी प्रणाम. महाराष्ट्र हा शूर वीरांचा व धर्मवीरांचा आहे.याची जान आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्यामुळे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान दिनाचे औचित्य साधून राज्यातील भ्रष्टाचार, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी, आरोग्य , शिक्षण इत्यादी समस्याकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.यामुळे जनतेला (प्रजेला) सुख-समाधान प्राप्त होईल.कारण आज आपण जो मोकळा श्वास घेतो व हसतो-बागडतो आहोत तो छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुंण्यायीमुळेच. हीबाब आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. महाराष्ट्र ही संतांची, शुर वीरांची, थोर महात्म्यांची व क्रांतीकारकांची पावणभुमि आहे.याची जोपासना आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी करने अत्यंत गरजेचे आहे.धर्मवीरांनी महाराष्ट्र घडवीण्यासाठी बलीदान दिले.परंतु आजचा राजकीय पुढारी गरीब, सर्वसामान्य, शेतकरी यांचे रक्त भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पीत आहे.याची खंत धर्मवीर संभाजी महाराज, साधुसंत, थोर पुरुष, क्रांतीकारक व आपले पुर्वज यांना अवश्य होत असेल.त्यामुळे कोणत्याही महापुरुषांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे व संभाजीं महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन पुढील वाटचाल व्हायला हवी.यातच आपल्याला धर्मवीर संभाजी महाराज दिसून येईल.आज बदलत्या हवामानामुळे प्रदूषणाच्या विळख्यात संपूर्ण पृथ्वी आहे.तीला वाचविण्यासाठी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून युध्दपातळीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.कारण आज लावलेले वृक्ष शेकडो काळ टिकेल. याच वृक्षांच्या पाणात, फुलात, फळात व जळामुळात संपूर्ण थोर महात्म्याचे व शुरविरांचे दर्शन अवश्य होईल.त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ले सुसज्जित करून पर्यटनासाठी मोकळी करावीत. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण -शान आहे. त्यामुळे त्यांची जपणूक केलीच पाहिजे. यामुळे नवीन पिढीला संपूर्ण गडकिल्ल्यांचा इतिहास समजण्यास सुलभ जाईल आणि शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचा इतिहास सहज समजूत येईल.कारण याच गडकिल्ल्यात महाराष्ट्राची संपूर्ण खरी संस्कृती दडलेली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी प्रणाम व मानाचा मुजरा. हर हर महादेव!

*******

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार.
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी,नागपूर) मो. नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# आर्यांनी भारत देश सोडावा..! किंवा विषमता सोडावी..!!

बालपणी शाळेत शिकताना आर्य कोठून आले..? आर्य लोकं कोण..? याचा इतिहास शिकलो. आर्य हे खैबर खिंडीतून भारतात आले आणि त्यांनी इथेच कायम वास्तव्यास राहून त्यांचा धर्म आणि संस्कृतीचा प्रसार प्रचार केला. आर्यांनी वर्णव्यवस्था निर्माण करुन येथील लोकांची जातीमध्ये विभागणी केली. तेव्हा पासून भारतामध्ये विषमव्यवस्था असल्याचे निदर्शनास येते. खरे तर ही व्यवस्था माणसाला माणूसपणाची शिकवण देत नाही. म्हणूनच एक जात विरुद्ध दुसरी जात, एक धर्म विरुद्ध दुसरा धर्म यांच्यात भांडणे, तंटा, लढाया, द्वेष, उच्च नीचपणाची भावना सातत्याने दिसून येते. आणि देशाचे अतोनात नुकसान होत असते. हे नुकसान देशातील जनतेला कराच्या रूपाने भरून काढावे लागते. त्यावरून बाजारभाव वाढून महागाई वाढते. आणि गरीब जनता गरीबच राहते. हे बदलावयाचे असेल तर थोडक्यात बदल करणे गरजेचे आहे. तो बदल असा की ज्या प्रकारे १९४७ साली परकियांनी भारत देश सोडून ते त्यांच्या देशात गेले त्याप्रमाणे हे आर्य सुद्धा त्यांच्या देशात गेले का? उत्तर नाही गेले असेच आहे. ते भारतातच राहिले ते आजपर्यंत. तेही त्यांचा विषम अजेंडा राबवित येथील जनतेवर गुलामी लादीत आहेत. हे मुळच्या भारतातील अनार्य लोकांनी ओळखून त्यांनाही ( आर्यांना ) खैबर खिंडीचा मार्ग परत दाखविला पाहिजे. आणि म्हटले पाहिजे कि जा, आर्यानो परत जा तुम्ही तुमच्या देशात ( युरेशिया ). भारत देश महान आहे. त्यांची धुरा आम्ही भारतीय लोक सांभाळण्यास समर्थ आहोत. इथे देशाचं संविधान आमच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिले आहे. त्यांना तुम्ही तुमचा बाप नाही मानले तरी काहीही हरकत नाही पण आम्ही आमचा बाप मानतो. सातत्याने भविष्यात संघर्ष टाळायचा असेल तर तुम्ही इथून निघून जा संघर्षाचे मुळाशी आपणच आहात. हे आम्ही जाणतो. शांतीचा, अहिंसा मार्ग भारत देशाने स्वीकारलेला आहे. त्यांचे उल्लंघन करणारे शिक्षेस पात्र किंवा देशद्रोही ठरतात. बौद्धमय भारतात हिंसेला थारा नाही. सर्वांना समान अधिकार, समता असेल. तरीही वर्ण सांभाळणारे विषमता सांभाळीत आहेत. ते त्या का सांभाळीत आहेत? आर्य लोकं येण्यापूर्वी देशात हे वर्ण देशात नव्हते. उच्च नीच कोणीही नव्हते. हे आर्य लोकं सोबत वर्ण घेऊन आले नाहीत ते एकटेच होते.परंतु त्यांनी येथील परकीयांच्या सत्तेत जवळीक साधून आपले वर्चस्व स्थापन केले. आणि निरनिराळ्या व्यवसायिकांना जातीत ढकलले, असे मत व्यक्त करावेसे वाटते. म्हणून ते पहिल्या वर्णात त्यांनी आपली स्वतःची वर्णी लावून घेतली आणि बाकीचे मूलनिवासी बहुजनाना खालच्या वर्णात गणना केली. ते याच भूमीतले मूलनिवासी आहेत. अभ्यासकानी तर्क करावा.




अज्ञानामुळे हे घडलय असं म्हटलं पाहिजे. देशात कोणीच शुद्र नव्हते. त्यांनी वर्णमाला आणून स्वतःला उच्च मानून इतरांना कमी लेखणे अशी चाणक्य नीतीचा वापर करुन शिव छत्रपतीनाही शुद्र म्हटलेलं आहे. त्यावेळीची ही अज्ञानताच नव्हे काय? विषमवर्ण मालिकेत असलेले सर्वांनाच समान दर्जा दिला पाहिजे. त्यांना भारतीय म्हटले पाहिजे. त्या वर्णात ज्यांची वर्णी लावलेय त्यांनी प्रथम अशी विषम व्यवस्था नाकारायला हवी होती की नको.? धर्मशास्त्र म्हणते म्हणून ते मान्य करणे चुकीचे आहे. त्या काळात लोकांना अंधारात ठेऊन लिहिण्याचा अधिकार फक्त आर्यांनी स्वतः ब्राह्मणांकडेच ठेवल्याने त्यांनी स्वतःसाठी उच्च स्थान ठेविले. तेच लोकं उच्च वर्गाचेच हितैशी राहिले आहेत, अन्य वर्गाचे नाहीत. हे अन्य वर्गाने लक्षात ठेवायला नको का ? त्यामुळेच भेद उघडपणे दिसतो. जो पर्यंत त्यांची जाणीव होत नाही तो पर्यंत भेदभाव अटळ आहे. आम्ही लहानपणी प्राथमिक मराठी शाळेत शिकत असतांना एक म्हण आठवते, ती म्हण अशी - भटाला दिली ओसरी भट हातपाय पसरी. तसेच एक आणखीन गोष्ट आठवते ती अशी - भट आपल्या पत्नी आणि मुलांचा सांभाळ - उदरनिर्वाह भिक्षुकी मिळे त्यावर करी. त्याची पत्नी घराच्या शेजारी असलेल्या शेवग्याच्या झाडाला येणाऱ्या शेवग्याच्या शेंगा विकून उपजीविका करीत असे. यावरून भटाची स्थिती कळते. ही गोष्ट जेव्हा तिच्या बंधूराजाला कळते तो बहिणीकडे येतो तिथे एक दिवस राहतो. आणि न कळत रात्रीचे ते झाड कापून टाकतो. आता उपजीविका चालविणे कठीण होईल म्हणून भट तेथून कुटुंबासह स्थलांतर करतो. आणि शहरात येतो. ही गोष्ट समाजाला डॉ. बाबासाहेबांनी सांगितल्याचं आठवलं. हे कुठल्यातरी पुस्तकात वाचलेली आता नीट आठवत नाही म्हणून ती येथे लिहिली. सांगायचा मुद्दा हा की भट म्हणजे ब्राम्हण होय. तुम्हाला त्याची हलाखीची त्यावेळची स्थिती गोष्टीत होती त्याप्रमाणे आज दिसते काय ? तेव्हाचे त्याचे हात पसरणारे हात आहेत का ? आणि आज त्यांच्या हातात अखंड भारत देश आहे, ओसरी नाही. तो भट भारतीयांना खेळवितो. तो भट जाती जातीत कलह निर्माण करतो, तो भट सुनामी आणतो, तो भट राजकारणाचे तिनतेरा करतो. तो भट करुना रोगाचं सावट आल्यावर थाळी वाजवायला सांगतो. तो भट अंधःकाराचे समर्थन करतो. उजेडास पाहत नाही. तो भट एससी एटी ओबीसी बांधव आरक्षण मागणाऱ्याप्रमाणे आरक्षण मागत नाही पण आता मराठेही आरक्षण मागत आहेत ते पाहतो आहे. एकवेळ देशाचे मालक समजणारे होते, ते आता आरक्षणाची मागणी करीत आहेत. हे असे घडले याचा मुळाशी जाऊन विचार केल्यास प्रामुख्याने दिसून येते की सम्राट अशोकाचा नातू ब्रहद्रथ यांना त्यांचा सेनापती पुष्य मित्र शृंग याने कपटाने ठार मारले. तिथपासून कपटाचे जाळे आजही भारतात पसरलेलं आहे. हे इतिहासावरून कळते. या भारतात महात्मा गांधी, इंदिरा गांधी, राजीव गांधी असा गांधी या शब्दाचा तिटकारा असल्याचे दिसते. यामागे ही कपटनीती असल्याचे म्हटले जाते. काहीजण चाणक्य नीति म्हणतात. होय चाणक्य नीति हा शब्द चपखल वाटावा असाच आजही आहे. कारण देशात होणाऱ्या पंचवार्षिक निवडणुका व त्याचे निकाल होय. सध्या मतपेटीत मत टाकता येते पण ते मत मतदार नव्हे तर त्यातील यंत्र ठरविते कुणाला द्यायचे, कुणाकडे जायचे ते.! ह्या प्रकारास कपटनीती म्हणायचं की आणखीन काही. ते आता तुम्हीच ठरवा. प्रथम या देशात पूर्वी पासून मंत्रतंत्र जादू टोणा याचं स्तोम आहे आता यांत नव्याने यंत्र (एतच्) ईव्हीएम ची देखील भर पडलीय. म्हणजे आता मंत्र तंत्र यंत्र कसं सारं अवैज्ञानिक.

ओसरी करिता मोताज असलेल्या भटाला उच्चस्थानावर ह्या बाकीच्या तीन वर्णानेच बसविले धर्माने नाही. आणि धर्म ही अफू ची गोळी म्हटलेय त्यांत अडकून देणारांचे हात आता मागणारे बनलेत. गरजवंताला अक्कल नसते ही मराठी भाषेत म्हटली जाणारी आणखीन एक म्हण अगदी रिपब्लिकन जनतेला म्हणजे आंबेडकरी जनतेला जी स्लम एरियात राहते त्यांना चपखल बसते. त्यांत इतर बहुजन सुद्धा गणला गेलाय. त्यांना आश्वासने दिली जातात. त्यांच्या तुटपुंज्या गरजा भागवून त्यांना कायमचे गरजवंत ठेऊन राजकारण केले जाते. आजपर्यंत रिपब्लिकन जनतेने नेत्यांना जवाबदार धरलेले आहे, स्वतःला नाही. जनतेचे प्रश्न सोडवितो तो नेता आपला असे रिपब्लिकन जनतेत कोणी सांगू शकेल का? याचे उत्तर नाही असे मानले तर आंबेडकराच्या राजकीय पक्षाचे तुकडे केल्याने आपणास काय मिळाले? जे न मिळाल्याने वंचीतच राहावे लागतं. म्हणून वंचित पक्ष स्थापन करणारे नेते वंचित आणि जनता सुद्धा वंचित राहते आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पने व्यतिरिक्त अन्य कुणाच्याही पक्ष फुटीच्या संकल्पना आंबेडकरी जनतेला दीर्घकाळ का जपाव्याशा वाटाव्यात बरे ? रिपब्लिकन जनतेने रिपब्लिकन न होणे याला जनताच जवाबदार आहे. असे म्हटले तर वावगे होणार नाही. जनतेला एक पक्ष आणि एका नेतृत्वाची निवड करता येत नाही. यास काय म्हणावे.? हीच काय बाबासाहेबांची जनता लाज वाटते स्वतःची स्वतःला आंबेडकर अनुयायी म्हणवून घेतांना, तुम्हाला वाटते कि नाही लाज.! भारत देश, आर्य हे परकीय असल्यामुळे आजही गुलामीच्या फेऱ्यात अडकून आहे. भारत नावाचं वावडं त्यांचेशिवाय कोणालाही नाही. म्हणून आर्यांना हाकला..! असं म्हणावंसं वाटतं.

********

मधुकर मोहिते, ( कवी - साहित्यिक ) ,
नेरूळ नवी मुंबई ६ मार्च २०२५.

# अजित पवारांनी मांडला महाराष्ट्राचा अर्थसंकल्प, 'या' आहेत १३ मोठ्या घोषणा



महाराष्ट्राचे अर्थमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार राज्याचा अर्थसंकल्प सादर करत आहेत. सुरुवातीलाच त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राच्या जनतेचे आभार मानले. अजित पवार अकराव्यांदा अर्थसंकल्प सादर करून, माजी अर्थमंत्री शेषराव वानखेडेंचा अर्थसंकल्प सादर करण्याच्या विक्रमाच्या जवळ पोहोचले. यापूर्वी शेषराव वानखेडे यांनी १३ वेळा, जयंत पाटील यांनी १० वेळा आणि सुशीलकुमार शिंदे ९ वेळा अर्थसंकल्प सादर केलाय. राज्याच्या महसुली स्थितीबाबत अर्थमंत्री अजित पवार यांनी सांगितलं की, राज्याची महसुली तूट ही सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या एक टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे. २०२५-२६ ची राजकोषीय तूट १ लाख ३६ हजार २३५ कोटी रुपये आहे.

अर्थसंकल्पातील महत्त्वाचे मुद्दे : महाराष्ट्रात देशी-परदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात, औद्योगिक विकासात राज्य अव्वल जानेवारी २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये महाराष्ट्र सरकारने एकूण ६३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले भारताच्या एकूण निर्यातीत महाराष्ट्राचं १५.४ टक्के वाटा येत्या काळात महाराष्ट्रात १५ लाख ७२ हजार ६५४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार मुंबई महानगर प्रदेश हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक विकास केंद्र म्हणजेच 'ग्रोथ हब' म्हणून विकसित करण्याचा निर्णय हातमाग विणकरांना प्रोत्साहन आणि सुविधा देण्यासाठी नागपूर येथे 'अर्बन हाट केंद्रां'ची स्थापना करण्यात येणार रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकडून मायक्रोसॉफ्ट कंपनीमार्फत १० हजार महिलांना कौशल्य व कृत्रिम बुध्दिमत्ता या विषयाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर, इनोव्हेशन सिटी, उभारण्यात येणार आहे. हवामान बदल आणि समुद्राच्या पातळीत होत असलेल्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या नैसर्गिक आपत्तींपासून बचाव करण्यासाठी महाराष्ट्रातील किनारी जिल्ह्यांमध्ये ८ हजार ४०० कोटी रुपये किंमतीचा बाह्यसहाय्यित प्रकल्प राबविण्यात येणार आहे. 'राज्याचे लॉजिस्टिक धोरण-२०२४' जाहीर : १० हजार एकराहून अधिक क्षेत्रावर समर्पित लॉजिस्टिक पायाभूत सुविधांचा विकास करणार, यातून ५ लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होणार आहे ज्या तालुक्यांमध्ये बाजार समिती अस्तित्वात नाही, तेथे किमान एक स्वतंत्र बाजार समिती स्थापन करण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यासाठी एक तालुका - एक बाजार समिती योजना राबविण्यात येणार आहे. २०२५-२६ साठी विभागनिहाय आर्थिक तरतुदी १) बंदरे विभागास ४८४ कोटी रुपये २) सार्वजनिक बांधकाम-रस्ते विभागास १९ हजार ९३६ कोटी रुपये ३) परिवहन विभागास ३ हजार ६१० कोटी रुपये ४) नगर विकास विभागास १० हजार ६२९ कोटी रुपये ५) ग्रामविकास विभागास ११ हजार ४८० कोटी रुपये ६) पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास २४५ कोटी रुपये ७) ऊर्जा विभागास २१ हजार ५३४ कोटी रुपये ८) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास २५ हजार ५८१ कोटी रुपये ९) आदिवासी विकास विभागास २१ हजार ४९५ कोटी रुपये १०) इतर मागास व बहुजन कल्याण विकास विभागास ४ हजार ३६८ कोटी रुपये ११) दिव्यांग कल्याण विभागास १ हजार ५२६ कोटी रुपये १२) अल्पसंख्याक विकास विभागास ८१२ कोटी रुपये १) 'लाडक्या बहिणीं'ना आतापर्यंत दिले ३३ हजार कोटी अजित पवार यांनी अर्थसंकल्प साद करताना माहिती दिली की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत सुमारे २ कोटी ५३ लाख लाभार्थी महिलांना जुलै, २०२४ पासून आर्थिक लाभ देण्यात येत आहे. त्यासाठी ३३ हजार २३२ कोटी रुपये खर्च झाला आहे. २०२५-२६ मध्ये या योजनेकरीता एकूण ३६ हजार कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे, असंही पवारांनी सांगितलं. तसंच, या योजनेतून मिळणाऱ्या अनुदानाचा उपयोग काही महिला गटांनी आर्थिक उपक्रमासाठी बीज भांडवल म्हणून केला असून अशा गटांना आणखी प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्याचे विचाराधीन आहे, अशी माहिती अजित पवारांनी दिली.

२) छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाचे काम प्रगतीपथावर

अजित पवार यांनी अर्थसंकल्पातून सांगितलं की, छत्रपती संभाजी महाराजांचे पवित्र बलिदानस्थळ असलेल्या मौजे तुळापूर आणि समाधीस्थळ मौजे वढु बुद्रुक येथे त्यांच्या भव्य स्मारकाचे काम प्रगतीपथावर आहे. दरवर्षी एका प्रेरणादायी गीताला 'छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणा गीत' पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णयही शासनाने नुकताच घेतला आहे. तसंच, छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेत होते, तेथे भव्य स्मारक उभारण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे. त्यासाठी उत्तर प्रदेश शासनाच्या सहकार्याने जागा उपलब्ध करुन घेण्यात येईल, असं अजित पवारांनी सांगितलं. इतर स्मारकांबाबत अर्थसंकल्पातून दिलेली माहिती : भारताचे दिवंगत पंतप्रधान, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मुंबई येथे भव्य स्मारक उभारण्यात येणार आहे. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाच्या पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्यातील कामासाठी राज्य शासनाकडून २२० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. आद्य शिक्षिका ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव असलेल्या नायगांव, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा येथे त्यांच्या कार्यास साजेसे स्मारक व महिला प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार आहे. चैत्यभूमी दादर, मुंबई येथे इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याचे काम सुरु असून त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. स्वराज्यासाठी बलिदान देणाऱ्या लाखो मराठ्यांच्या शौर्याचे प्रतिक म्हणून हरियाणातील पानिपत येथे यथायोग्य स्मारक उभारण्याचा निर्णयही आम्ही घेतला आहे. हरियाणा शासनाच्या मदतीने या स्मारकासाठी जागा उपलब्ध करुन घेण्यात येईल. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जन्मस्थळ वाटेगांव, तालुका वाळवा, जिल्हा सांगली येथील स्मारकासाठी तसेच त्यांच्या नांवे प्रस्तावित चिरागनगर, मुंबई येथील संशोधन व प्रशिक्षण संस्थेसाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. ३) '२०३० पर्यंत वाढवण बंदर सुरू होणं अपेक्षित' अजित पवार यांनी अर्थसंकल्पातून सांगितलं की, जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरण आणि महाराष्ट्र सागरी मंडळ हे संयुक्तरित्या पालघर जिल्ह्यात वाढवण बंदर विकसित करित आहेत. या प्रकल्पाचा एकूण खर्च ७६ हजार २२० कोटी रुपये असून त्यात राज्य शासनाचा सहभाग २६ टक्के आहे. वाढवण बंदरामुळे सुमारे ३०० दशलक्ष मेट्रीक टन वार्षिक मालहाताळणी क्षमता निर्माण होणार आहे. जवाहरलाल नेहरु बंदराच्या सध्याच्या क्षमतेपेक्षा ती तिप्पट असणार आहे. सन २०३० पर्यंत नव्या बंदरातून मालवाहतूक सुरु होणे अपेक्षित आहे. या बंदराचा समावेश कंटेनर हाताळणी करणाऱ्या जगातील पहिल्या १० बंदरांमध्ये होणार असल्याने महाराष्ट्र राज्य भविष्यात सागरी दळणवळणातील महाशक्ती म्हणून उदयास येईल. वाढवण बंदराजवळ मुंबईसाठी तिसरे विमानतळ प्रस्तावित असून मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानकही या बंदराजवळ असणार आहे. हे बंदर समृध्दी महामार्गालाही जोडण्यात येणार आहे. ४) गडचिरोलीला 'स्टील हब' बनवणार गडचिरोली जिल्ह्याबाबत अर्थमंत्री अजित पवार यांनी विशेष उल्लेख करत म्हटलं की, एकेकाळी नक्षलग्रस्त म्हणून ओळखला जाणारा गडचिरोली जिल्हा आता 'स्टील हब' म्हणून उदयास येत आहे. अजित पवार यांनी पुढे सांगितलं की, दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये गडचिरोली जिल्ह्याकरिता २१ हजार ८३० कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यातून ७ हजार ५०० रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे. गडचिरोली जिल्ह्यातील दळणवळणासाठी खनिकर्म महामार्गांचे जाळे विकसित केले जात असून त्याकरिता पहिल्या टप्प्यात सुमारे ५०० कोटी रुपये किंमतीची कामे हाती घेण्यात येणार आहेत. ५) समृद्धी महामार्गालगत 'अ‍ॅग्रो-लॉजिस्टिक हब' या अर्थसंकल्पातून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाबद्दलही माहिती दिली. समृद्धी महामार्गाचं ९९ टक्के काम पूर्ण झाले असून त्यासाठी ६४ हजार ७५५ कोटी रुपये खर्च झाला आहे. इगतपुरी ते आमणे हा ७६ किलोमीटर लांबीचा टप्पा लवकरच वाहतुकीसाठी खुला होईल, असं अजित पवारांनी सांगितलं. तसंच, या महामार्गालगत अ‍ॅग्रो-लॉजिस्टिक हब विकसित केले जाणार असून त्यात कोल्ड स्टोरेज, ग्रेडिंग, पॅकिंग व निर्यात हाताळणी केंद्राच्या प्रमुख सुविधा पुरविण्यात येतील. याचा लाभ प्रामुख्याने विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना होईल, अशीही माहिती दिली. ६) ग्रामसडक योजनेच्या दुसऱ्या टप्प्याची घोषणा मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेबाबत माहिती देताना अजित पवार म्हणाले, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ ची कामे पूर्णत्वास आली असून टप्पा-२ अंतर्गत ९ हजार ६१० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या दर्जोन्नतीची कामे मार्च, २०२६ अखेर पूर्ण करण्याचं नियोजन आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ अंतर्गत अतिरिक्त ७ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-३ अंतर्गत १ हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ३ हजार ५८२ गावे, १४ हजार किलोमीटर लांबीच्या सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याने प्रमुख जिल्हा मार्गांना, राज्य महामार्ग किंवा राष्ट्रीय महामार्गांना जोडली जातील. या प्रकल्पाची एकूण किंमत ३० हजार १०० कोटी रूपये आहे. पहिल्या टप्प्यात ८ हजार कोटी रूपये रकमेची कामे हाती घेण्यात येणार असल्याचं पवार यांनी सांगितलं. ७) हवामान बदलासंदर्भात घोषणा हवामान बदल आणि समुद्राच्या पातळीत होत असलेल्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या नैसर्गिक आपत्तींपासून बचाव करण्यासाठी महाराष्ट्रातील किनारी जिल्ह्यांमध्ये ८ हजार ४०० कोटी रुपये किंमतीचा बाह्यसहाय्यित प्रकल्प राबविण्यात येणार असल्याचं पवार यांनी सांगितलं. महाराष्ट्र शाश्वत पर्यावरणपूरक किनारा संरक्षण व व्यवस्थापन या ४५० कोटी रुपये किंमतीच्या प्रकल्पांतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवबाग येथे १५८ कोटी रुपये किंमतीच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे समुद्रकिनारी वास्तव्यास असलेल्या नागरीकांच्या जीविताचे व मालमत्तेचे रक्षण होईल, असं पवार म्हणाले. ८) 'सर्वांसाठी घरे'चं उद्दिष्टसर्वांसाठी घरे' हे उद्दिष्ट येत्या पाच वर्षात साध्य करण्यासाठी राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे, असं अजित पवारांनी सांगितलं. यावेळी अजित पवार म्हणाले की, राज्यात प्रधानमंत्री आवास योजना, पीएम जनमन या केंद्र पुरस्कृत तर रमाई आवास, शबरी आवास, आदिम आवास, पारधी आवास, अटल बांधकाम कामगार वसाहत, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास, मोदी आवास तसेच धर्मवीर आनंद दिघे घरकुल या योजना राबविण्यात येत आहेत. त्याअंतर्गत आतापर्यंत एकूण ४४ लाख ७ हजार घरकुल मंजूर करण्यात आली आहेत. तसंच, ते पुढे म्हणाले की, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा - २ अंतर्गत सन २०२४ -२५ करिता २० लाख घरकुलांच्या उद्दीष्टापैकी सुमारे १८ लाख ३८ हजार घरकुलांना मंजुरी दिली असून १४ लाख ७१ हजार लाभार्थींना पहिल्या हप्त्यासाठी २ हजार २०० कोटी रुपये वितरीत करण्यात आले आहेत. ही योजना राबविण्यात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे.लोकप्रतिनिधी आणि लाभार्थींच्या मागणीला प्रतिसाद म्हणून राज्य शासनाकडून या योजनेच्या अनुदानात ५० हजार रुपयांची वाढ करण्यात येणार आहे. या सर्व घरकुलांच्या छतावर सौर उर्जा संच बसविण्यात येणार आहेत.९) कृषि क्षेत्रात -ख सह अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचे धोरण कृषि क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानासाठीचे धोरण मांडताना पवार म्हणाले, कृषि क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचे धोरण आखण्यात येत आहे. शेतकऱ्यांना पीक नियोजनाचा सल्ला देणे, उत्पादन खर्च कमी करणे, उत्पादकता वाढविणे, दर्जेदार शेतमालाचे उत्पादन तसेच शेतमालाला हक्काची व शाश्वत बाजारपेठ मिळवून देणे यासाठी शासकीय, निमशासकीय व खाजगी क्षेत्रात उपयुक्त असलेल्या प्रणाली शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. याच्या पहिल्या टप्प्यात ५० हजार शेतकऱ्यांच्या एक लाख एकर क्षेत्राला त्याचा फायदा होईल. येत्या दोन वर्षात त्यासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, असं पवार यांनी सांगितलं. १०) जलयुक्त शिवार अभियान २.० जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत ५ हजार ८१८ गावांमध्ये ४ हजार २२७ कोटी रुपये किंमतीची १ लाख ४८ हजार ८८८ कामे हाती घेण्यात आल्याची माहिती अजित पवारांनी दिली. अभियानातील सर्व कामे मार्च, २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याचंही पवारांनी सांगितलं. ११) नदीजोड प्रकल्पाचे धोरण वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पास तत्वत: मान्यता देण्यात आली असल्याचं पवार यांनी सांगितलं. या प्रकल्पाची अंदाजित किंमत ८८ हजार ५७४ कोटी रुपये असून प्रकल्पाचे लाभक्षेत्र ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टर आहे. या प्रकल्पाचा लाभ नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला व बुलढाणा या सहा जिल्हयांना होणार आहे. प्रकल्पाची सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषणाची कामे सुरू आहेत. दमणगंगा-एकदरे-गोदावरी या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असून त्यामुळे जायकवाडी धरणाच्या लाभक्षेत्रातील ९ हजार ७६६ हेक्टर क्षेत्र पुनर्स्थापित होईल. नाशिक जिल्ह्यातील २ हजार ९८७ हेक्टर क्षेत्रालाही यामुळे सिंचनाचा लाभ होईल. या प्रकल्पाची अंदाजित किंमत २ हजार ३०० कोटी रूपये आहे, असं पवार म्हणाले. १२) विमानतळांसाठीचे धोरण महाराष्ट्रातील आगामी विमानतळांच्या धोरणाबाबत माहिती देताना अजित पवार म्हणाले, शिर्डी विमानतळाच्या १ हजार ३६७ कोटी रुपये किंमतीच्या विकास कामांना मान्यता देण्यात आली असून ती कामे सुरु आहेत. सन २०२१ मध्ये शिर्डी विमानतळाला प्रमुख विमानतळाचा दर्जा प्राप्त झाला आहे. नाईट लँडिगची सुविधाही लवकरच सुरु करण्यात येणार आहे. तसेच, रत्नागिरी विमानतळाची १४७ कोटी रुपये रकमेची कामे प्रगतीपथावर आहेत. यासह अमरावतीतील बेलोरा विमानतळाचे काम पूर्ण झाले असून तेथून ३१ मार्च, २०२५ पासून प्रवासी सेवा सुरु करण्याचे नियोजन आहे. गडचिरोली येथील नवीन विमानतळाच्या सर्वेक्षण व अन्वेषणाची कामे सुरु आहेत. तर, अकोला विमानतळाच्या विस्तारासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचं पवार यांनी सांगितलं. १३) अनुसूचित जाती उपयोजनेच्या तरतुदीत ४२ टक्के भरीव वाढ अजित पवार अर्थसंकल्पातून सांगितलं की, अनुसूचित जाती घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना, विद्यार्थी वसतिगृहे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्तीसुधार योजना इत्यादी योजना राबविण्यात येत आहेत. महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळाव्दारेही अनेक योजना राबविण्यात येत आहेत. अनुसूचित जाती उपयोजनेच्या तरतुदीत गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी ४२ टक्के एवढी भरीव वाढ करण्यात आली आहे.

# पत्रकार सचिन साखरे आदर्श युवा पत्रकार पुरस्काराने सन्मानित

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील आवसगावचे भूमिपुत्र तथा परळी वार्ताचे जिल्हा प्रतिनिधी सचिन साखरे यांची दैनिक शिवजगार, विश्वनाथ फाउंडेशन यांनी महाराष्ट्र रत्न गौरवआदर्श युवा पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सवित्रीबाई फुले स्मारक, संस्कृतिक भवन गंजपेठ पुणे येथे सुप्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड, सिने दिग्दर्शक ओमकार माने, मिसेस ग्लोबल इंडिया स्मिता राठोड, उद्योजिका सुजताताई चिंता यांच्यासह इतर मान्यवरनाच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे संयजोक ड. शंकर शेषेराव चव्हाण विश्वनाथ फाउंडेशन, दैनिक शिवजगार इन्फोडाड यांनी केल आहे हे मागील अनेक वर्षा पासून सामाजिक, राजकीय, कला, संस्कृतिक, क्रीडा, पत्रकारिता, आदर्श ग्रामपंचायत, अशा अनेक क्षेत्रातील चांगले कार्य करणार्यांना पुरस्कार देऊन सन्मान करतात. त्यातील २०२५ वर्षीचा महाराष्ट्र रत्न आदर्श युवा पत्रकार पुरस्कार पत्रकार सचिन धनराज साखरे यांना मिळाल्या बदल त्याचे सर्व क्षेत्रातील हितचिंतक यांच्या अभिनंदन करण्यात येत आहे.




# विकासकामांसाठी सर्वांना सोबत घेवून प्रयत्न करणार-खा.बजरंग सोनवणे

केज/प्रतिनिधी ग्रामीण भागात अनेक विकास कामे करणे आवश्यक आहे. अजूनही ग्रामीण भागात चांगल्या सुविधा मिळू शकत नाहीत. येणाऱ्या काळात आपल्याला आवश्यक ती विकास कामे करायची असून त्यासाठी सर्वांना सोबत घेवून विकासकामे करण्याचा प्रयत्न करणार आहे, असे प्रतिपादन खा.बजरंग सोनवणे यांनी केले. खा.बजरंग सोनवणे यांच्या माध्यमातून केज तालुक्यातल विडा आणि गप्पेवाडी, गौरवाडी येथे विविध विकास कामांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. गप्पेवाडी येथील कार्यक्रमाला माजी आ.पृथ्वीराज साठे, पंचायत समितीचे माजी सभापती ज्ञानेश्वर चौरे, पंचायत समितीचे सदस्य पिंटू ठोंबरे, तालुका अध्यक्ष शंकर जाधव, विलास जोगदंड, अर्जुन केदार, अशोक केदार, पांडुरंग केदार, संतोष केदार यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती. तर विडा येथील कार्यक्रमाला माजी आ.पृथ्वीराज साठे, श्रीराम महाराज विडेकर, सुदाम महाराज शास्त्री, संजय महाराज शिरुरकर, पंचायत समितीचे सभापती ज्ञानेश्वर चौरे, पंचायत समिती सदस्य पिंटू ठोंबरे, तालुका अध्यक्ष शंकर जाधव, सरपंच सुरज पटाईत, उपसरपंच सदाशिव वाघमारे, उधव देशमुख, दिलीप पटाईत, उद्धव पटाईत, बाबासाहेब पटाईत, रणजित, गुट्टे, दत्ता गुट्टे, जानमिया शेख आदी मान्यवर उपस्थित होते. तर गौरवाडी येथील विकास कामांच्या उद्घाटन कार्यक्रमास कार्यकारी अभियंता एम.एम पाटील, उपअभियंता के.बी शेख, बंडू चौधरी, रुपेश बोरगावकर, डॉ.संतोष ढाकणे, तानाजी घाडगे, विनोद घाडगे, महादेव घाडगे, प्रकाश रोमन, आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले,



या दोन्ही गावातील नागरिकांनी माझ्यावर मोठा विश्वास मतातून दाखविलेला आहे. आज तुमच्याच आशीर्वादाने मी सभागृहात जावू शकलो. तुम्ही तुमची जबाबदारी पुर्ण केली असून आता मी माझी जबाबदारी पुर्ण करण्याचा प्रयत्न करत आहे. येणाऱ्या काळात या भागाच्या विकासासाठी मला जे जे करावे लागेल ते मी करेल. ग्रामीण भागात विकास कामे करायला मोठी संधी आहे. याच संधीचे सोने आपण करू आणि विकास कामांसाठी सर्वांना सोबत घेवून कामे करू, असेही ते म्हणाले.

# संविधान हे आपल्या डीएन ए चा भाग झालं पाहीजे : दिपा पवार

कुटुंब, समाज, जात ,धर्म, या प्रत्येक ठिकाणी स्त्रियांना तुला हे जमनार नाही, तु गप्प बस, तुला शक्य नाही असे सांगून कायम दुय्यम स्थान देण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानामुळे प्रत्येक व्यक्तीला आपल्या अधिकाराचा उपयोग आणि उपभोग घेता येतो म्हणून संविधान हे आपल्या डी.एन ए चा भाग झालं पाहीजे असे मत लेखिका, अनुभूती ट्रस्टच्या संचालक व सामाजिक कार्यकर्त्या दिपा पवार यांनी व्यक्त केले. सनराईज बहुउद्देशीय सामाजिक संस्था व दयानंद शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दयानंद च्या सभागृहात महिला दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी दीपा पवार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष दयानंद कल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर शिवाजी गायकवाड, सनराईज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष नंदिनी पडले ,सामाजिक पर्यावरण कार्यकर्ते तज्ञ सुपर्ण जगताप, प्राचार्य क्रांती सातपुते, प्राचार्य पूनम नाथानी ,उपप्राचार्य अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ दिलीप नागरगोजे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची प्रास्ताविक डॉ अंजली जोशी यांनी केले. तर सनराईज संस्थेचे अध्यक्ष नंदिनी पडविले यांनी त्यांचा संघर्षमे जीवन प्रवास आणि पौलादी बाया हे पुस्तक वाचल्यानंतर लेखिकेचा प्रवास वाचून प्रभावित होऊन हा कार्यक्रम घेण्याचे मनाशी पक्के ठरवले होते असे सांगितले. तर सुपर्ण जगताप यांनी दीपक पवार यांचा संघर्ष आणि कार्यक्रम घेण्यामागची भूमिका स्पष्ट केली. अध्यक्षीय समारोप मध्ये प्राचार्य शिवाजी गायकवाड म्हणाले हा कार्यक्रम विद्यार्थिनींसाठी खूप गरजेचा आहे आणि त्यामुळे अशी व्याख्यान होणे जरुरी आहे असे सांगितले. पोलादी बाया म्हणून महिलांची ओळख होणे आवश्यक आहे . दिपा पवार म्हणाल्या शेवटच्या बँच वर बसणारे कुल वाटतात ,मस्ती करणारे वाटतात पण खरंतर तेच क्रांती करतात. भटक्या जमातीतील मुले शाळेतील शेवटच्या बँच वर बसलेली असतात. पण सामाजिक योगदानामध्ये त्यांची क्रांती महत्त्वाची असते. महिलांची ओळख ही भावनिक न होता पोलादी बाया अशी निर्माण होणे ही काळाची गरज आहे. नैसर्गिक रित्या बाळाला दूध पाजणे यातच खरे ज्ञान सामावलेले आहे. लाजेचा शोध घेण्यासाठी माझा प्रवास नसून नारीच्या नेतृत्वात अशक्य गोष्टी शक्य करून दाखवण्यासाठी माझा प्रवास आहे.






पोलादी बाया हे पुस्तक वेदना आणि यातना यासाठी नसून कणखरपणाचे प्रतीक आहे असेही ते यावेळी म्हणाल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नियोजन समिती सदस्य डॉ अशोक नारनवरे , प्रा दशरथ भिसे, प्रा पंचशील डावकर , डॉ बी आर पाटील ,गणेश माशाळकर, डॉ सितम सोनवणे, श्याम जैन, डॉ गणेश गोमारे , आझम शेख यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमासाठी सनराईज सामाजिक संस्थेच्या महिला सदस्य सामाजिक कार्यकर्ते दयानंद शिक्षण संस्थेचे कर्मचारी यांचे योगदान मिळाले.

# राज्य परिवहन महामंडळाने तिकीट दरामध्ये १५ टक्क्याने वाढ ,सुट्या पैशांवरून होतात वाद

किनवट: शेख शौकत :–राज्य परिवहन महामंडळाने एसटीच्या तिकीट दरात १५ टक्के वाढ केली आहे. यानुरूप अनेक टप्यांच्या तिकीटांमध्ये २ ते ३ रूपयाहून अधिकची वाढ तिकीटे पूर्णांक संख्येच्या एका रूपयाने वाढ झाल्यामुळे प्रवासी आणि वाहकही चांगलेच अडचणीत आले आहेत. प्रवाशांकडून सुटे एक रूपये वाहक जेव्हा मागतो, तेव्हा प्रवासी सुटे पैसे सुट्या पैशांवरून होताहेत चाद नसल्याचे सांगून हातवर करतो. अशातच वाहकांपुढे सर्वांना ९ रूपये सुटे कुठून द्यायचे, असा प्रश्न निर्माण होतो. त्यातूनच भुर्दंड सोसावा, अन्यथा प्रवाशांच्या रोषाला सामोरे जावे, याशिवाय वाहकाकडे कुठलाही पर्याय शिल्लक राहिला नाही. त्यामुळे एसटीची तिकीट दरवाढ वाहकांसाठी डोकेदुखीची ठरली आहे. राज्य परिवहन महामंडळाने तिकीट दरामध्ये १५ टक्क्याने वाढ केली आहे. यामुळे टप्पानिहाय तिकीटात वाढ करण्यात आली आहे. कांही टप्याचे तिकीट ३१ रूपये, कुठे ४१ रूपये यासह अशा अनेक गावांची तिकीट ११ रूपये, २१ रूपये, ५१ रूपये, ६१ रूपये, ७१ रूपये अशा कारण्यात आल्या आहेत. पूर्णांक संख्येत तिकीट दर नसल्याने प्रवासी थेट १०० किंवा ५० रूपयाची नोट देवून मोकळा होता. अशात वाहक प्रवाशांना एक रूपये सुटे मागतो. तेव्हा प्रवासी देत नाही. अशा परिस्थितीत वाहकाला एक प्रवाशाला ९ रूपये परत करणे अक्घड जाते. परिणामी वाहकालाएक रूपयाचा भुर्दंड सोसणे भाग पडत आहे. तर दुसरीकडे एक रूपयासाठी प्रवाशांच्या रोषाला समोर जावे लागत आहे. विशेष म्हणजे, सुट्या एक रूपयाकरीता

वरिष्ठ अधिकारी म्हणतात ग्राहकांच्या तक्रारीची दखल घेत नाही. पूर्णांकामध्ये तिकीट दर नसल्याने सुट्या पैशाला घेवून वाहकाला वादाला समोर जावे लागत आहे. किंबहुना भुर्दंड सोसावा लागत आहे. या प्रकाराला घेवून वाहकांकडून वरिष्ठांकडे तक्रार करण्यात आली. मात्र एसटीचे वरिष्ठ अधिकारी या संदर्भात पुढे निर्णय घेण्यात येईल, असे सांगून मोकळे होत आहेत. या तिकीट वाढीने वाहकाला दररोज १०० ते २०० रूपयाचा भुर्दंड सोसावा लागत आहे.



एसटी वाहक व प्रवाशांमध्ये दररोज खटके उडत आहेत. तिकीट दरवाढीमुळे वाहकांची चांगलीच डोकेदुखी वाढली आहे.

## विक्रीपत्र नोंदणीकृत होईपर्यंत, स्थावर मालमत्तेची मालकी हस्तांतरित होत नाही : सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली, : विक्रीपत्र नोंदणीकृत होईपर्यंत स्थावर मालमत्तेची मालकी हस्तांतरित होत नाही, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा नोंदवले आहे. केवळ ताबा हस्तांतरित करणे आणि मोबदला देणे यामुळे मालकी हस्तांतरित होत नाही. तर विक्रीपत्र नोंदणीकृत करावे लागेल. मालमत्ता हस्तांतरण कायदा, १८८२ च्या कलम ५४ चा संदर्भ देत, न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती एन.के. सिंह यांच्या खंडपीठाने हे निरीक्षण नोंदवले.
संजय शर्मा विरुद्ध कोटक महिंद्रा बँक लिमिटेडच्या २०२४ मधील खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले. मालमत्ता हस्तांतरण कायदा, १८८२ च्या कलम ५४ नुसार १०० रुपये किंवा त्याहून अधिक किमतीच्या मूर्त स्थावर मालमत्तेसाठी विक्रीपत्रांची नोंदणी अनिवार्य आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, विक्री करार नोंदणीकृत होईपर्यंत मालकी खरेदीदाराकडे जात नाही, कोणतेही अनौपचारिक करार किंवा देयके केली असली तरीही.
सर्वोच्च न्यायालयाने बाबासाहेब धोंडिबा कुटे विरुद्ध राधू विठोबा बर्डे या खटल्याचा देखील संदर्भ दिला. यामध्ये न्यायालयाने म्हटले आहे की, विक्रीद्वारे मालमत्तेचे हस्तांतरण नोंदणी कायदा, २००८ च्या कलम १७ अंतर्गत नमूद केल्यानुसार विक्री कराराच्या नोंदणीनंतरच होते.

## वाहनासह ०९ लाख २१ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू जप्त. ०२ व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

लातूर :– वाहनासह ०९ लाख २१ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू जप्त. ०२ व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.
या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे,यांचे मार्गदर्शनात संपूर्ण लातूर जिल्ह्यात अवैध धंद्यावर कठोर कारवाईची मोहीम राबवित येत आहे.
दिनांक ०८/०३/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकास महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ तंबाखूजन्य पदार्थाची अवैध विक्री व्यवसाय करण्यासाठी वाहतूक करीत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाली. सदर माहितीवरून पथकाने दिनांक०८/०३/२०२५ रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यामध्ये विक्रीसाठी प्रतिबंधित केलेला ०१ लाख २१ हजार ८७० रुपयांचा गुटखा, सुगंधित तंबाखू व एक पिकअप वाहन असा एकूण ०९ लाख २१ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. प्रतिबंधित गुटका, सुगंधित तंबाखूची अवैधरित्या वाहतूक करीत असताना मिळून आलेले इसम नामे
शहानवाज हमीद शेख, वय ३५ वर्ष, राहणार बोळे गल्ली, खडक हनुमान, लातूर, इरफान सय्यद, राहणार बोळे गल्ली, खडक हनुमान लातूर.(फरार)
यांचे विरुद्ध पोलीस ठाणे गांधी चौक येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.
सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात पोलीस अंमलदार मनोज खोसे, रियाज सौदागर, साहेबराव हाके, अर्जुन राजपूत, राहुल कांबळे यांनी केली आहे.




## शेतकरी, सर्वसामान्यांच्या हिताकडे दुर्लक्ष करणारा अर्थसंकल्प – धिरज देशमुख



राज्य सरकार कडून आज अर्थसंकल्प सादर करण्यात आला. राज्यातील नागरिकांसाठी निराशाजनक हा अर्थसंकल्प असून शेतकरी, शेतमजूर, महिला, तरूण यांच्या हिताकडे अर्थसंकल्पात दुर्लक्ष करण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. लाडकी बहीण योजने अंतर्गत २१००रू निधी देणार असल्याचे मोठ्या आविर्भावात सांगण्यात आले होते मात्र येथे देखील लाडक्या बहिणींच्या पदरात निराशा पडली आहे. वाढता खर्च व कमी उत्पन्न अशा परिस्थितीत शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्याने आपला शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. त्यांचे कर्जमाफी करण्यासंदर्भात देखील कसलेच धोरण सरकारने अवलंबले नाही. जुन्याच योजनांचा पाढा पुढे वाचला जात आहे. राज्यावर जवळपास ७ ते ८ लाख कोटींचे कर्ज असून अशा परिस्थितीत महाराष्ट्र कसा प्रगतीपथावर जाईल असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडलेला आहे. महायूती सरकारने लोकप्रिय योजना घोषीत जरी केल्या असल्यातरी त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे त्यांना सोपे नाही. विविध योजनांवरील वाढता खर्च, महसुली तुट, राज्यांवरील वाढते कर्ज याचा विचार करून याबाबतीत नीती आयोगाने राज्य सरकारला यापूर्वीच सावध केलेले आहे. अशा बिकट परिस्थितीतून राज्य सरकारने आज सादर केलेला अर्थ संकल्प हा घोर निराशा करणारा आहे.

************

श्री. धिरज विलासराव देशमुख,
माजी आमदार, लातूर ग्रामीण

## घरफोडी च्या गुन्ह्यातील सराईत आरोपींना अटक.०७ गुन्हे उघड.पोलीस ठाणे विवेकानंद ची कामगिरी.

लातूर :– घरफोडी च्या गुन्ह्यातील सराईत आरोपींना अटक. ०४ लाख ६५ हजार रुपयांचासोन्या–चांदीचामुद्देमाल जप्त. ०७ गुन्हे उघड.पोलीस ठाणे विवेकानंद ची कामगिरी.
याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक. १८/०२/२०२५ रोजीचे १०.०० ते दि.२१/०२/२०२५ रोजीचे ०७.०० वाजण्याच्या दरम्यान कातपूर रोड, लातूर येथील एका घरातील लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्याचे दागीने व चांदीचे शिक्के तसेच रोख रक्कम असा एकुण ३,८९,९००/– रुपये चा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरुन घेऊन गेले वरुन पो. स्टे. विवेकानंद चौक, लातूर येथे गुरनं ११०/२०२५ कलम ३३१ (३), ३३१(४),३०५ भारतीय न्याय संहिता प्रमाणे दिनांक २२/०२/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.गुन्ह्याचा तपास पोलीस उप निरीक्षक सचिन रेडेकर हे करीत आहेत.
पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधीकारी (लातूर शहर) रणजीत सांवत यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे विवेकानंद चे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांचे नेतृत्वात पोलीस ठाणे विवेकानंद चौक, चे पथकाला सखोल मार्गदर्शन व सूचना करून रवाना करण्यात आले होते. दरम्यान पोलीस पथकांने मोठ्या प्रमाणात गोपनिय बातमीदार नेमूण आरोपीतांचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेण्यात आले यातील आरोपी नामे १) विजय बापू काळे, वय–२४ वर्षे, राहणार हंगरगा (तुळ) ता. तुळजापूर जि. धाराशिव २) नागेश गणपत धोत्रे वय–२३ वर्षे,राहणार हंगरगा (तुळ) ता. तुळजापूर जि. धाराशिव ३) विधिसंघर्षग्रस्त बालक रा. हंगरगा तुळ ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी सदररचा गुन्हा केल्याचे कबुल केले.
यातील आरोपीतांकडून सोन्याचे दागीने,चांदीचे शिक्के व होंडा कंपणीची यूनिकॉर्न मोटार सायकल मुद्देमाल जप्त करण्यात आला.
तसेच नमुद आरोपीतांना इतर गुन्ह्या बाबत अधिक विचारपूस केली असता त्यांनी इतरही ठिकाणी चोरी केल्याचे कबूल केले. नमुद आरोपी कडून पोलीस स्टेशन विवेकानंद चौक, लातूर येथील
१) गुरनं ११०/२०२५
२) गुरनं ८०८/२०२४
३) गुरनं ७६४/२०२४
४) गुरनं ७५८/२०२४
५) गुरनं ०१/२०२५
६) गुरनं १५/२०२५,
७) गुरनं १२/२०२५
असे एकुण मालाविषयी घरफोडीचे ०७ गुन्हे उघडकीस आणून सोन्याचे दागीने व चांदीचे शिक्के व गुन्ह्यात वापरलेली मोटार सायकल असा एकुण ४,६५,०००/– रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.




सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधीकारी (लातूर शहर) रणजीत सांवत यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे विवेकानंद चे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांचे नेतृत्वात पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर येथील पोउपनि सचिन रेडेकर यांच्या पथकामधील पोलीस अंमलदार खुर्रम काझी, गणेश यादव, यशपाल कांबळे, रवी गोंदकर, राणा देशमुख, रमेश नामदास, सचिन राठोड, आनंद हल्लाळे, संतोष कलबोने, सहायक पोलीस निरीक्षक अमीतकुमार पुणेकर,पोलीस अंमलदार धनंजय गुट्टे, संतोष देवडे, शैलेश सुडे यांनी केलेली आहे.

## खासदार चंद्रशेखर आझाद, विनरतन सिंग, अशोक कांबळे यांनी त्यांना योग्य सुरक्षा पुरवा - अक्षय धावारे

### महाराष्ट्रातील वाढत्या अनुसूचित जाती जमातीवरील अन्याय अत्याचारावर बंदी घाला

लातूर – चंद्रशेखर आझाद, भीम आर्मीचे संस्थापक आणि महाराष्ट्र आणि देशातील बहुजन समाजाच्या हितासाठी काम करणारे आझाद समाज पक्षाचे प्रमुख खा. भाई चंद्रशेखर आजाद आणि भीम आर्मीचे राष्ट्रीय अध्यक्ष भाई विनय रतन सिंह, या नेत्यांवर नुकतेच मथुरा आणि ओरिसा राज्यात सार्वजनिक कार्यक्रमात हल्ले झाले आहेत आणि जीवित आणि मालमत्तेची हानी करण्याचा प्रयत्न झाला आहे. यामुळे देशभरातील बहुजन समाजात संतापाचे वातावरण आहे.या आधीही खासदार चंद्रशेखर आझाद यांच्यावर प्राणघातक हल्ले झाले आहेत. त्यामुळे त्यांना पोलिस संरक्षण देण्यात आले होते. मात्र देशभरात बहुजन समाजाच्या हितासाठी सक्रियपणे काम करणारी भीम आर्मी ही सुरक्षेला अपयशी ठरली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष मा. विनय रतन सिंग तसेच राष्ट्रीय सरचिटणीस श्री.अशोक कांबळे, जे महाराष्ट्रातून देशभरात कार्यरत आहेत, तेही भेदभाव करणाऱ्या समाजकंटक भावनांमुळे धोक्यात आले आहेत. या यासाठी भाई चंद्रशेखर आझाद यांना न+ सुरक्षा प्रदान करण्यात यावी आणि भाई विनयरतन सिंग आणि अशोक कांबळे यांना कोणताही विलंब न लावता मजबूत सुरक्षा व्यवस्था प्रदान करण्यात यावी.महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात अनुसूचित जाती जमातींवर अन्याय, अत्याचाराच्या अनेक घटना घडत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेमध्ये सरकारबद्दल प्रचंड रोष आहे.परभणी जिल्ह्यात राज्यघटनेचा अवमान करणाऱ्या आरोपींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्यांची नार्को टेस्ट करण्यात यावी.परभणी जिल्ह्यातील पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जचे दृश्य मोबाईलमध्ये टिपलेल्या सोमनाथ सूर्यवंशी या सुशिक्षित तरुणाला परभणी कारागृहात जबरदस्तीने मारहाण करण्यात आली. त्यामुळे तुरुंगातच त्याचा मृत्यू झाला. आणि या सामाजिक कार्यकर्त्याचा पोलिसांच्या दडपशाहीत हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला, या घटनेशी संबंधित सर्व संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना तात्काळ सेवेतून काढून टाकावे व खुनाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी भिम आर्मी च्या वतीने संबंध महाराष्ट्र भरातून जिल्हाधिकारी यांच्या मार्फत राष्ट्रपती यांच्या कडे करण्यात आली अशी माहिती भिम आर्मी चे मा.महाराष्ट्र प्रदेश संघटक तथा मराठवाडा निरीक्षक अक्षय धावारे यांनी दिली



## औसा खरेदी विक्री संघाच्या नूतन संचालकाचा गोंद्री येथे सत्कार

औसा : औसा तालुका शेतकरी खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली बिनविरोध विजयी झालेल्या सर्व बिनविरोध विजयी झालेल्या सर्व नूतन संचालकाचा तालुक्यातील गोंद्री येथे सत्कार सोहळा पार पडला. याप्रसंगी क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजीव कसबे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख संतोष सूर्यवंशी, युवासेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे, शहरप्रमुख सुरेश भुरे, खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण, बाजार समितीचे माजी उपसभापती किशोर जाधव, माजी तालुकाप्रमुख संजय उजळंबे, विधानसभा संघटक श्रीराम कुलकर्णी, अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष सलीम पटेल, शिवाजी हांडे, महादेव पाटील, गणेश जाधव, हिप्परसोगा सरपंच मनोज सोमवंशी, श्रीधर सांळुके, नंदकुमार सांळुके, नवनाथ लवटे, केशव डांगे, बालाजी धुमाळ, राजेंद्र साळुंके, शाहूराज जाधव यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी श्रीहरी काळे, नारायण भोसले, हंसराज लंगर, महेश लंगर, संदीपान कांबळे, सत्तार ढालाईत, विलास पाटील, विलास लंगर, हजीर ढालाईत, केशव माळी, नरहरी काळे, धनराज कदम, अमर भोसले, मुस्ताक शेख, महताब ढालाईत विठ्ठल कांबळे, उध्दव लंगर, भागवत लंगर, सुभाष लंगर यांनी परिश्रम घेतले. यावेळी बोलताना औसा तालुका खरेदी विक्री संघाचे संस्थापक तथा शिवसेना जिल्हाप्रमुख संतोषभाऊ सोमवंशी म्हणाले की, औसा तालुका तसेच जिल्ह्यातील शेतकर्यांच्या हितासाठी सतत प्रयत्न करीत राहू. औसा तालुका खरेदी–विक्री संघाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना तूर, हरभरा अनुदान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला. तसेच हमीभावाने शेतीमाल खरेदी करून तालुक्यातील शेतकऱ्यांना मदत केली, असे यावेळी सोमवंशी म्हणाले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE